## मॅन्युअल क्र.८

## माहितीचा अधिकार अधिनियम-२००५
## कलम ४ (१) (ब) VIII

**(८) महामंडळाच्या कामकाजाचा भाग म्हणून अथवा त्यासंदर्भात सल्ला देण्यासाठी दोन अथवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींचा समावेश असलेल्या मंडळ, परिषद समिती व अन्य यंत्रणा इ. चा तपशील या मंडळ, परिषद, समिती व अन्य यंत्रणांच्या बैठका जनतेसाठी खुल्या असतात का अथवा या बैठकांचे इतिवृत्त जनतेसाठी उपलब्ध असतात काय.**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतीत सार्वजनिक उपक्रम असून महामंडळाच्या दैनंदिन कामकाजामध्ये सहाय्यभूत ठरण्याच्या दृष्टीने खालील समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेतः-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **तांत्रिक सल्लागार समिती** | - | आवश्यकतेनुसार एखाद्या विशिष्ट प्रकल्पासंदर्भात तांत्रिक सल्ला देण्यासाठी महामंडळाबाहेरील त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांची समिती गठित करण्यात येते. |
| (२) | **कंत्राटदारांच्या मागण्यासंबंधीची समिती** | - | कंत्राटदारांनी देयकांसंदर्भात केलेल्या मागण्यांवर विचार करुन त्यावर निर्णय घेण्यासाठी ही समिती गठित करण्यात आली आहे. |
| (३) | **निविदा समिती** | - | प्रकल्पांसाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर कार्यवाही करण्यासाठी ही समिती गठीत करण्यात आली आहे. |
| (४) | **तज्ज्ञ समिती** | - | प्रकल्पांच्या महत्वाच्या टप्पासंबंधी दिशा दिग्दर्शन करण्यासाठी तसेच शिफारशी करण्यासाठी ही समिती गठित करण्यात येते. सर्वसाधारणपणे यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असून ते त्रयस्थ म्हणून महामंडळास सल्ला देतात. |

वरील समित्यांनी त्यांची मते / शिफारशी महामंडळास दिल्यानंतर महामंडळ त्यावर स्वतंत्रपणे निर्णय घेते.

या समित्यांच्या बैठका अथवा त्याची इतिवृत्ते जनसामान्यांसाठी खुली नाहीत.